# मुकुल माधव फाउंडेशनमुळे विशेष मुलांना आधार

## साताऱ्यात सेरेब्रल पाल्सी खुर्ची, व्हिलचेयर्स कमोड व्हिलचेयर्स साहित्याचे वाटप

**सातारा, ता. ४ :** कोणी पायाने अपंग पण बसायला खुर्ची नाही, शाळेत जातोय; पण टेबल नसल्याने जमिनीवर जोपावे लागते, शौचास आले तर खूपच अडचण... अशा अनेक सदस्यांची ग्रासलेल्या जिल्ह्यातील सुमारे ३०० विशेष मुलांना आधार मिळाला आहे. 'फिनोलेक्स'च्या मुकुल माधव फाउंडेशनने आज विशेष मुलांना ६२ लाखांच्या सेरेब्रल पाल्सी खुर्ची, व्हिलचेयर्स, कमोड व्हिलचेयर्स साहित्याचे वाटप केले.



**सातारा : व्हिलचेयर्सच्या वाटपप्रसंगी उदयनराजे भोसले, दमयंतीराजे भोसले. डावीकडून डॉ. परवेज ग्रँट, रितू छाब्रिया, आश्विन मुद्गल, श्याम देशपांडे, नितीन पाटील.** (प्रमोद इंगळे : सकाळ छायाचित्रसेवा)

खासदार उदयनराजे भोसले, अतिरिक्त आयुक्त श्याम देशपांडे, जिल्हाधिकारी आश्विन मुदगल, मुख्य कार्यकारी अधिकारी नितीन पाटील, जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष रवी साळुंखे, दमयंतीराजे भोसले, फाउंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्त रितू छाब्रिया, रूबी हॉल क्लिनिकचे डॉ. परवेज ग्रँट, 'केएमई'च्या डॉ. भारती पाटील, कूपर उद्योगसमूहाचे व्यवस्थापिक संचालक फरोख कूपर, 'फिनोलेक्स'चे व्यवस्थापक बी. आर. मेहता, जिल्हा आरोग्य अधिकारी दिलीप माने, प्राथमिक शिक्षणाधिकारी पुनीता गुरव आदींच्या उपस्थित प्रतिनिधी स्वरूपात चेअरचे वाटप केले. श्याम देशपांडे, डॉ. परवेझ ग्रँट, दमयंतीराजे भोसले यांची भाषणे झाली.

**'फिजिओथेरपी' होणार**

विशेष मुलांना केवळ खुर्ची देऊन उपयोग नाही, हे आम्हाला समजले आहे. त्यांना फिजिओथेरपिस्टमार्फत त्यांची आरोग्य तपासणी करून, व्यायाम, औषधोपचारासाठीही प्रयत्न करणार आहोत. या मुलांना सर्वंकष आधार पुरविण्याच्या उद्देशाने साताऱ्यातील रूबी हॉल हेल्थ केअर सर्व्हिसेस येथे विशेष सल्ला केंद्र उघडणार आहे. बालमेंदू तज्ज्ञ आणि मानसशास्त्रज्ञांसारख्या तज्ज्ञांची उणीव पूर्ण करण्यास यामुळे मदत होईल, अशी माहिती रितू छाब्रिया यांनी दिली.